# ठाणे स्थानकातील गर्दीची समस्या लवकरच मार्गी लागेल-खा. डॉ. संजीव नाईक

## सॅटीसला समांतर जोड पूल न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी**

नवी मुंबई, ठाणेकर रेल्वे प्रवाशांना अधिकाधिक चांगली सेवा मिळावी यासाठी मागील ३ वर्षांपासून पाठपुरावा केल्याने रेल्वे प्रशासनाने अनेक विषयांवर सकारात्मक भूमिका घेतली आहे. मध्य रेल्वेच्या दोन्ही मार्गावर १५ डब्यांची रेल्वे सेवा सुरू करणे तसेच ठाण्यातील महत्त्वपूर्ण अशा सॅटीस पुलाला समांतर जोडणारा १२ मीटर रुंदीचा प्लाय व्होअर ब्रीज उभारण्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून लवकरच ठाणे रेल्वे स्थानकातील गर्दीची समस्या मार्गी लागेल, असा विश्वास ठाण्याचे खा.डॉ.संजीव नाईक यांनी आज (ता.२४) व्यक्त केला.

खासदार डॉ. संजीव नाईक यांनी आज नवनिर्वाचित रेल्वेचे विभागीय मुख्य प्रबंधक राहुल जैन यांची भेट घेऊन ठाणे, नवी मुंबई परिसरातील रेल्वे प्रवाशांना भेडसाविणाऱ्या समस्यांची माहिती दिली. तसेच रेल्वे प्रशासनाकडे यापूर्वी केलेल्या मागण्यांचा आढावा घेतला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ठाणे शहर (जि.) कोषाध्यक्ष दिनेश शिंदे, रेल्वेचे अधिकारी अतुल राणे, सचिव, अधिकारी उपस्थित होते.

ठाणे रेल्वे स्थानकाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी ठाण्याचे खा.डॉ.संजीव नाईक प्रयत्न करीत आहेत. नुकतीच जानेवारी महिन्यात तत्कालीन रेल्वेचे विभागीय मुख्य प्रबंधक चौहान यांची भेट घेऊन ठाणे रेल्वे स्थानक तसेच वाशी-ठाणे मार्गावरील बंद तिकीट खिडक्या, बंद उद्घोषणा, शौचालय, स्टेशनची स्वच्छता, तसेच गाड्यांच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी केली होती. खा.डॉ.नाईक यांनी या समस्यांची पूर्तता न झाल्यास प्रवाशांच्या हितार्थ तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर यातील अनेक मागण्यांची पूर्तता झाली आहे.

दरम्यान, ठाणे रेल्वे स्थानकातील वाढती गर्दी लक्षात घेता सॅटीस पुलाला जोडणारा १२ मीटर रुंदीचा समांतर पूल उभारण्याची मागणी वर्षभरापूर्वी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. या महत्त्वपूर्ण विषयाचा आढावा खा.डॉ. संजीव नाईक यांनी आज नवनिर्वाचित प्रबंधक जैन यांच्याकडून जाणून घेतला. वर्षभरापासून मागणी करूनही रेल्वे प्रशासनाने समांतर पूल उभारण्याच्या मागणीचा गांभीर्याने विचार न केल्याबद्दल प्रथमत: नाराजी व्यक्त केली. मागील वर्षात या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असती तर नागरिकांची होणारी गैरसोय दूर झाली असती, असे रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. रेल्वे प्रशासनाच्यावतीने माहिती देताना रेल्वेचे मुख्य प्रबंधक जैन यांनी येत्या १ महिन्यात याची निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्षात कामाला सुरूवात होणार असल्याचे सांगितले. खा.डॉ. संजीव नाईक यांनी रेल्वे प्रवाशांना होणाऱ्या त्रासाबाबत रेल्वे प्रशासनाची कोणतीही हयगय खपवून घेणार नसल्याचे सांगत वेळप्रसंगी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. २२ लाख ठाणेकरांसाठी एकच रेल्वे स्टेशन असल्याने प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली.

ठाणे-वाशी-ठाणे-मुंबईकडे येणाऱ्या-जाणाऱ्या ठाणेकर प्रवाशांसाठी १५ डब्यांची विशेष सेवा सुरू करणे, ठाणे-पनवेलची सेवा कर्जतपर्यंत विस्तारित करणे, नेरूळ-पनवेल मार्गावरील गाड्यांच्या फेऱ्यात वाढ करणे, इंद्रायणी, कन्याकुमारी लांब पल्ल्याच्या गाड्या ठाणे रेल्वे स्थानकात थांबविण्यास परवानगी देणे, ठाणे-वाशी रेल्वे गाड्या ठाणे रेल्वे स्थानकात थांबविण्यास परवानगी देणे, ठाणे-वाशी रेल्वे मार्गावरील हायवे लगत (पूर्व) तिकीट खिडक्यात वाढ करणे, ठाणे ते दिवा मार्गे विरार सेवा सुरू करणे, महिलांच्या सुरक्षेविषयक अधिक सुरक्षा बल तैनात करणे आदी मागण्यांचे निवेदन यावेळी रेल्वेचे मुख्य प्रबंधक (विभागीय) जैन यांना देण्यात आले.

### (बॉक्स)

'१२ मीटर समांतर पुलासाठी रस्त्यावर उतरू'

ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता पर्यायी व्यवस्था म्हणून सॅटीस पुलाला समांतर असा १२ मीटरचा जोडपूल उभारण्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. मात्र, रेल्वे प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसून आगामी १ महिन्यात यावर निर्णय न झाल्यास प्रवाशांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनाचा इशाराही खा.डॉ.संजीव नाईक यांनी यावेळी प्रसिध्दी माध्यमांशी बोलताना दिला.